# कार्यालयीन आदेश क्रमांक ०३ /२०१७.

विषय : कर्मचारीवर्ग खात्यांतर्गत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या नियुक्तीबाबत.

संदर्भ : कार्यालयीन आदेश क्रमांक १५/२०१६, दिनांक ११.११.२०१६.

संदर्भित कार्यालयीन आदेशान्वये कर्मचारीवर्ग खात्यांतर्गत वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांमध्ये माहितीचा अधिकारी अधिनियमांतर्गत कामकाज वाटप करण्यात आले असून, त्यामध्ये जन माहिती विषयक कामकाजाबाबत संबंधित सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी हे जन माहिती अधिकारी म्हणुन कांमकाज पाहतील, असे नमुद करण्यांत आलेले आहे.

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ६/२००६ (जा.क्र. राप/आस्था/४०८-ई (१)/९०८, दिनांक २३.०२.२००६) अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ मधील तरतूदीनुसार, कर्मचारीवर्ग खात्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत, खालील अधिकारी/कर्मचारी यांची कक्षनिहाय जन माहिती अधिकारी, व प्रथम अपिलीय प्राधिकारी पदी नेमणूक करण्यात येत आहे :-

| कक्ष | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|
| प्रशासन<br>सामान्य प्रशासन | श्री.अ.ग.लाळगे,सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी | श्री.अ.ना.गोहत्रे, उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग) |
| मनुष्यबळ-नियोजन/ समन्वय | श्री.अ.क.गुप्ते, सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी | |
| घटकसंवर्ग | श्री.पी.के.धुरंधर, सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी (हं.) | |
| मागासवर्ग | श्री.म.ओ.बोराळे, सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी | |
| राज्यसंवर्ग | श्री.प्र.ल.राठोड, सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी, ( राज्यसंवर्ग ) अतिरिक्त कार्यभार. | |
| मुख्यालय | श्री.प्र.ल.राठोड, सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी | |

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर, विहित कालावधीत कार्यवाही करण्यात यावी. याबाबत कोणतीही हयगय/ दिरंगाई झाल्यास, याबाबतची जबाबदारी संबंधित जन माहिती अधिकारी यांची राहील. याच प्रकारे उक्त अधिनियमाच्या कलम १९ [१] अंतर्गत प्राप्त होणा-या प्रथम अपील अर्जांवर विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्याची दक्षता प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी घ्यावी.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व.औ.सं.)

कर्मचारीवर्ग खाते
क्रमांक राप/कर्मवर्ग/आस्था/मुख्यालय/ 363
दिनांक : २० जानेवारी, २०१७.

प्रत :
मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /कर्मचारीवर्ग अधिकारी /
सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/ (मावक)/ (राज्यसंवर्ग)/
(मुख्यालय)/(सा.प्रशासन)/ (प्रशासन)/ (घटकसंवर्ग)/
उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

(माधव काळे)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)